सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना 2018-19 अंतर्गत प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश

# जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

दुरध्वनी क्र.02452-222644 - फॅक्स क्र.02452-223774 - ई-मेल - dpo.pbn@gmail.com

जा.क्र.जिनिस/जिवायो-2018-19/संस/कंत्राटी/पगार/ 878

दिनांक: 11 मे, 2018

संदर्भ :- 1. महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे शासन निर्णय क्र.जिवायो-1007/प्र.क्र.39/का-1444,दि.16.02.2008

2. महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे शासन निर्णय क्र.डिएपी-1010/प्र.क्र.203/का-1481,दि.09.08.2010

3. महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.पदनि-2010/84/10/विशु -1, दि.27.09.2010

4. जिल्हाधिकारी तथ अध्यक्ष, जिल्हा सेतु समिती, परभणी यांचे आदेश क्र.2017/जिनिक/सिआर- / दि.28.11.2017

## प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत 2018-19 या वितीय वर्षामध्ये उपरोक्त संदर्भ क्र.1 च्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मुल्यमापन, संनियंत्रण, डाटा एंट्री या योजनेंतर्गत मंजुर तरतूद रु.72.23 लक्ष मंजुर असुन रु.50.561 लक्ष जिल्हाधिकरी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती यांचे BDS वर उपलब्ध झाली आहे. या उपलब्ध झालेल्या तरतूदींमधुन संदर्भ क्र.4 वरील आदेशान्वये जिल्हा नियोजन समिती कार्यालय, परभणी येथे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांच्या मानधनावरील खर्च भागविण्याकरीता रु.1.82 लक्ष च्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करुन **रु.1.82 लक्ष (अक्षरी रुपये एक लक्ष ब्याऐंशी हजार फक्त)** निधी खालीलप्रमाणे वितरित करण्यात येत आहे.

( रु. लाखात)

| अ. क्र. | योजनेचे / कामाचे नांव | अर्थसंकल्पित तरतूद | प्रशासकीय मान्यता रक्कम | आता वितरित करावयाची तरतूद | लेखाशिर्ष नियोजन विभाग महसुली मागणीक्रमांक - 50 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | मुल्यमापन, संनियंत्रण, डाटा एंट्री अंतर्गत | 72.23 | 1.82 | | 3451,सचिवालयीन आर्थिक सेवा<br>00,101,नियोजन आयोग नियोजन मंडळ<br>(49) जिल्हा योजना परभणी<br>(49)(02) योजनेचे मुल्यमापन संनियंत्रण व आधारसामुग्री नोंद<br>(3451 2111) 13 - कार्यालयीन सेवा |
| 1 | जिल्हा नियोजन समिती कार्यालयात तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्त कर्मचा-यांचे मानधन अदा करणे. | | | 1.82 | |
| | एकूण | 72.23 | 1.82 | 1.82 | |

(अक्षरी रुपये एक लक्ष ब्याऐंशी हजार फक्त)

**वरील योजनेस खालील अटीस अधीन राहूनच प्रशासकीय मान्यता व निधी वितरण करण्यात येत आहे.**

1. या आदेशान्वये वितरित करण्यात येत असलेला रु.1.82 लक्ष (अक्षरी रुपये एक लक्ष ब्याऐंशी हजार फक्त) निधी बीडीएस प्रणाली नुसार मंजूर रोख प्रवाह (Cash flow) प्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येईल त्यानुसार सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, परभणी यांनी संदर्भ क्र.4 च्या अधिन राहुन शासनाने विहित केलेल्या आहरण पध्दतीचा वापर करुन कोषागारातून आहरण करावे, आणि जिल्हाधिकारी तथ अध्यक्ष, जिल्हा सेतु समिती, परभणी यांना जिल्हा नियोजन समिती कार्यालयात तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्त कर्मचा-यांचे मानधन अदा करणे करीता उपलब्ध करुन दयावे. वितरीत केलेल्या निधी पेक्षा जादा खर्च केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

2. सदर कामाची/योजनेची अंमलबजावणी सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्गमीत केलेल्या शासन निर्णय / मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात यावी.

3. या कामासाठी आवश्यक असलेल्या तांत्रीक बाबीची तसेच शासनाने ठरवून दिलेल्या निकषाची पुर्तता करण्याची जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

4. या योजनेंतर्गत कामांची खाजगी/त्रयस्थ यंत्रणेमार्फत मुल्यमापन करण्यात येवू शकेल. तेव्हा योजनेतंर्गत होणाऱ्या खर्चाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा. आणि दरमहा 5 तारखेपूर्वी या कार्यालयास अहवाल सादर करावा.

5. सदर योजनेसाठी उपलब्ध करुन दिलेल्या सहाय्यक अनुदानांची उपयोगीता प्रमाणपत्रे व पुर्णत्वाचे दाखले महालेखापाल कार्यालयास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी. तसेच या योजनांवर झालेल्या खर्चाचे महालेखापाल यांचे कार्यालयात नोंद झालेल्या खर्चाशी ताळमेळ घालुन त्याची सुध्दा एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

6. योजनेच्या अमलबजावणीवर, खर्चावर व तांत्रीक बाबीवर संबधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे नियंत्रण राहील.

7. या योजनेतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप लोकलेखा समिती, विधीमंडळ कामकाज इत्यादी बाबीसाठी संबधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचा मंत्रालयीन प्रशासकीय विभाग जबाबदार राहील.

8. या आदेशान्वये वितरीत करण्यात आलेल्या निधीचा खर्च वरीलप्रमाणे योजनेच्या पुढे स्तंभ क्र.6 मध्ये दिलेल्या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा.

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

प्रत -

1. महालेखापाल नागपूर - 2
2. जिल्हाधिकारी तथ अध्यक्ष, जिल्हा सेतु समिती, परभणी
3. सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, परभणी यांना कार्यवाहीस्तव
4. जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी